ePaper
ठाकरे बंधूंची युती झाल्यास मविआमध्ये पडणार फूट? पडद्यामागे घडामोडींना वेग
| वर्ष - 9 | अंक -46 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- भारतीय करणार स्टार्कचा सामना
- मुंबई विरुद्ध महाराष्ट्र सामन्यात तुफान राडा
- भारत-रशिया संबंध आणखी दृढ
- बिहारमध्ये भाजपाचं गणित बिघडणार?


www.mahaenews.com | बुधवार, दि. 8 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## झोपडपट्टी ते तुकडाबंदी — मंत्रिमंडळ बैठकीत सर्वात मोठे 9 निर्णय

# राज्याचा चेहरा बदलणार!

## राज्यात मोठे बदल होणार; मुंबईतील झोपडपट्टीसंदर्भातही एक मोठा निर्णय



| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. विशेष म्हणजे या बैठकीत दोन मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील पहिला निर्णय हा तुकडा बंदीबाबत आहेत. या निर्णयानुसार तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना शासनाचा मोठा दिलासा मिळणार आहे. दुसरा निर्णय हा झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात आहेत. या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या दोन प्रमुख निर्णयांसह इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.**

### उद्योग विभाग

महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण – २०२५ जाहीर करण्यात आले आहे. सोने, चांदीचे दागिने,हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार आहे. एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेच उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

### नगर विकास विभाग

राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावरील प्रक्रियेच्या धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. सांडपाण्यावरील प्रक्रीयेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराव्दारे चक्रीय अर्थव्यवस्थेस (सर्क्युलर ईकॉनॉमी)ला चालना मिळणार आहे. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार आहे. राज्यातील ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग

स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना 2 लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा 980 आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार.

### महसूल विभाग

तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्या ताली आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. अधिनियमातील कलम ८ (ब) चे परंतुक वगळून कलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार आहे.

### गृहनिर्माण विभाग

मुंबईत झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण (एसआरए) अंतर्गत झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी समूह पुनर्विकास योजना (Slum Cluster Redevelopment Scheme) राबविण्यात येणार आहे.

### महसूल विभाग

अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जींग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २ हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### इतर मागास बहुजन कल्याण विभाग

स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे..अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे.

### वस्त्रोद्योग विभाग

खासगी सूतगिरण्यांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत सहकारी सूतगिरण्यांप्रमाणे युनीट मागे ३ रुपये वीज अनुदान सवलत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत क्लस्टरमधील सुतगिरण्यांना दिलासा मिळणार आहे.

### वस्त्रोद्योग विभाग

यंत्रमागधारकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागणार आहे. शासन निर्णय जारी झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत नोंदणी करावी लागणार आहे.

### विधि व न्याय विभाग

अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय, या न्यायालयाकरिता आवश्यक पदांना

## अब की बार शंभर पार

## पिंपरी-चिंचवडमध्ये पवारांना थेट भाजपचं आव्हान

# अजित पवारांना महेश लांडगेंनी डिवचले

## लांडगे हे अजित पवारांची डोकेदुखी



। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी "अब की बार शंभर पार" चा नारा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी दिला आहे. महेश लांडगे यांनी अप्रत्यक्षपणे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डिवचल्याच बोललं जात आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर पुन्हा एकदा राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी अजित पवार प्रयत्नशील आहेत. त्याआधी भाजप आमदार महेश लांडगे हे अजित पवारांची डोकेदुखी ठरू लागले आहेत.**

आगामी महानगरपालिका निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. राज्यामध्ये महायुती म्हणून भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष एकत्र आहेत. परंतु, आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी स्वबळावर लढण्याची भाषा महायुतीतील नेते करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील अप्रत्यक्षपणे आगामी महानगरपालिका स्वबळावर लढणार असल्याचे संकेत दिले आहेत.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर अजित पवारांचे लक्ष आहे. अजित पवारांचे पिंपरी- चिंचवड मध्ये दौरे देखील झाले. कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांची मूठ बांधण्याचा प्रयत्न ते करत आहेत. परंतु, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर पुन्हा एकदा सत्ता आणण्यासाठी त्यांना स्थानिक भाजपशी दोन हात करावे लागणार आहेत. अजित पवारांसमोर आमदार महेश लांडगे यांचं कडवं आव्हान असणार आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार महेश लांडगे यांचं पडद्यामागील राजकारण सर्वश्रुत आहे. शंभरी पार म्हणत महेश लांडगे यांनी देखील अजित पवारांना डिवचल्याच पाहायला मिळत आहे. पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे मावळते आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची नाशिक येथे बदली झाली. मेट्रो व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपवला आहे. यानंतर महेश लांडगे यांनी "अब की बार शभर पार" नारा दिला आहे. तशा आशयाची पोस्ट व्हायरल होत आहे. त्यामुळे हा निव्वळ योगायोग म्हणायचा का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.भाजपच्या कार्यकाळात श्रावण हर्डीकर हे पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त होते. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याकडे पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचा पदभार दिला आहे. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत, तर भाजपच्या गोठात आनंदी वातावरण दिसत आहे. आगामी काळात पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर राष्ट्रवादी की भाजपची सत्ता येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. परंतु, त्याआधी भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये सत्ता संघर्ष बघायला मिळेल हे मात्र नक्की. आगामी महानगरपालिका निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. राज्यामध्ये महायुती म्हणून भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष एकत्र आहेत. परंतु, आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी स्वबळावर लढण्याची भाषा महायुतीतील नेते करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील अप्रत्यक्षपणे आगामी महानगरपालिका स्वबळावर लढणार असल्याचे संकेत दिले आहेत.पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर अजित पवारांचे लक्ष आहे. अजित पवारांचे पिंपरी- चिंचवड मध्ये दौरे देखील झाले. कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांची मूठ बांधण्याचा प्रयत्न ते करत आहेत. परंतु, पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेवर पुन्हा एकदा सत्ता आणण्यासाठी त्यांना स्थानिक भाजपशी दोन हात करावे लागणार आहेत. महेश लांडगे यांचं कडवं आव्हान असणार आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आमदार महेश लांडगे यांचं पडद्यामागील राजकारण सर्वश्रुत आहे. शंभरी पार म्हणत महेश लांडगे यांनी देखील अजित पवारांना डिवचल्याच पाहायला मिळत आहे.

### निव्वळ योगायोग म्हणायचा का?

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे मावळते आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची नाशिक येथे बदली झाली. मेट्रो व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपवला आहे. यानंतर महेश लांडगे यांनी "अब की बार शभर पार" नारा दिला आहे. तशा आशयाची पोस्ट व्हायरल होत आहे. त्यामुळे हा निव्वळ योगायोग म्हणायचा का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मला जाणीवपूर्वक ट्रोल केलं जात आहे

## नृत्यांगना गौतमी पाटील यांची पहिली प्रतिक्रिया



। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हो, ती कार माझी आहे; पण अपघाताच्या वेळी मी कारमध्ये नव्हते. पोलिसांनी सीसीटीव्ही तपासून हे स्पष्ट केले आहे की मी यात दोषी नाही. तरीही मला दोषी ठरवले जात आहे. मला बऱ्याच गोष्टींसाठी जाणीवपूर्वक ट्रोल केले जाते. त्यामुळे मी आता या गोष्टींकडे लक्ष देणार नाही. मी म्हणते — आणखी ट्रोल करा."**

पुणे शहरातील नवले पुला जवळ 30 सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास एका भरधाव कारने रिक्षाला जोरात धडक दिली.त्या घटनेमध्ये रिक्षाचालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. तर त्या रिक्षाचालकावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.तर त्या अपघाताच्या घटनेमध्ये नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या मालकीची कार असल्याची माहिती पोलीस तपासातसमोर आली. त्यानंतर जखमी असलेल्या रिक्षाचालकाच्या कुटुंबीयासह अनेक संघटनांनी गौतमी पाटील यांना अटक करून कारवाई करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली.यावरून अनेक राजकीय प्रतिक्रिया येण्यास देखील सुरुवात झाली. या घटनेला जवळपास आठ दिवसाचा कालावधी होत आला तरी देखील गौतमी पाटील यांनी त्यांची भूमिका मांडली नव्हती. त्या सर्व घडामोडी दरम्यान गौतमी पाटील यांचा पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.त्या कार्यक्रमानंतर गौतमी पाटील यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधला असता त्या म्हणाल्या,ती कार माझी आहे.पण मी अपघाताच्या वेळी कारमध्ये नव्हते. मी हे अगोदर देखील सांगितले असून त्या अपघाताच्या घटनेच्या प्रकरणी पोलिसांनी सीसीटीव्ही देखील तपासले आहे. मी यामध्ये दोषी नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.तरी देखील मला दोषी ठरविले जात आहे.त्यामुळे मी या गोष्टीकडे जास्त लक्ष देणार नाही.

### दादांचा वैयक्तित प्रश्न...

अपघातातील जखमी व्यक्ती आणि कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी माझे भाऊ गेले होते.आम्ही त्यांना मदतीचा हात पुढे केला होता.मात्र त्यांनी गुन्हा दाखल असल्याने,ती मदत नाकारली आहे.त्यामुळे आता यापुढे सर्व गोष्टी न्याय मार्गाने होईल,अशी भूमिका त्यांनी मांडली. भाजपचे नेते मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पोलिसांना फोन करून आदेश दिले की,गौतमी पाटीलला उचलणार आहेत का नाही.त्या प्रश्नावर गौतमी पाटील म्हणाल्या,दादा जे बोलले हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**मिशन PCMC :** प्रभाग रचनेच्या लढाईत खासदार बारणे-आ. लांडगे यांचा "शतप्रतिशत कंट्रोल"

# राष्ट्रवादी काँग्रेसची पहिल्या टप्प्यातच कोंडी!

## एकूण सहा प्रभागांमध्ये प्रस्थापित उमेदवार "डॅमेज"

। पिंपरी चिंचवड ।

विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड ।। महापालिका निवडणुकीती विजयाच्या दिशेने घोडदौर करण्याचा पहिला टप्पा म्हणजे प्रभाग रचनेवरील पकड मजबूत करणे. या टप्प्यात शिवसेना खासदार श्रीरंग बारणे आणि भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी बाजी मारली. बारणेंनी विशेष लक्ष घातले आणि आपला मुलगा विश्वजित बारणे यांचा मार्ग सोपा केला. त्याचा परिणाम अन्य तीन प्रभागांवर झाला. तर, आमदार लांडगे यांनी विधानसभा निवडणुकीत "फूसफूस" करण्याऱ्यांची नांगी ठेचली आहे.**




महापालिका सार्वत्रिक निवडणूक-2025 साठीची प्रभाग रचना भाजपा आणि शिवसेना शिंदे गटास अनुकूल झाली आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट आणि महाविकास आघाडीसाठी प्रतिकूल झाली आहे, असा दावा केला जातो. खासदार श्रीरंग बारणे यांनी उद्धव ठाकरे गटास आणि भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार गटास शह दिला. प्रभाग रचनेमध्ये दोन प्रभाग आमदार लांडगे यांच्या भागातील आणि एक प्रभाग खासदार बारणे यांच्या भागातील आहे.

खासदार बारणे यांचे प्रभावक्षेत्र असणाऱ्या पदमजी पेपर मिल, गणेशनगर प्रभाग २४ मध्ये मागीलवेळी चारपैकी एक जागा अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव होती. यातून शिवसेनेचे सचिन भोसले निवडून आले होते. पुढे ते ठाकरे गटाचे शहराध्यक्ष झाले. आता यातील म्हातोबा वस्ती हा परिसर प्रभाग २५ वाकडला जोडला आहे. त्यामुळे या प्रभागातील अनुसूचित जातीची मतदारसंख्या कमी होणार आहे. परिणामी या गटाचे आरक्षण राहणार नाही. त्यामुळे भोसले यांना उभे राहण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी आहे.

तसेच, गेल्यावेळी २४ मधून बारणे यांचे पुतणे नीलेश बारणे निवडून आले होते. यावेळी मुलगा विश्वजित इच्छुक आहे. त्यामुळे मुलगा आणि पुतण्या या दोघांना सुरक्षित करण्यासाठी बारणे यांनी यातील परिसर प्रभाग २५ ला जोडला आहे. त्या ठिकाणी राष्ट्रवादीला संधी नाही आणि महाविकास आघाडीच्या पॅनेलवरसुद्धा परिणाम होणार आहे. विशेष म्हणजे, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाने प्रभाग रचनेत अपेक्षीत असलेले बदल करण्याबाबत मोठी 'फिल्डिंग' लावली होती. मात्र, खासदार बारणे आणि आमदार लांडगे यांनी प्रभाग रचनेवर "शतप्रतिशत कंट्रोल" ठेवला. निवडणुकीच्या वातावरण निर्मितीमध्ये या निमित्ताने भाजपा-सेना आघाडीवर आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवला आहे.

### राज्य सरकारकडे काय आहे प्रस्ताव?

शहरातील एकूण ३२ प्रभागांमधील केवळ ३ ठिकाणी बदल झाला आहे. प्रभाग क्रमांक १, ६ आणि २४ असे बदल झालेले प्रभाग असून, त्याचा परिणाम प्रभाग २९, २५, ३, १२ मध्ये होणार आहे. प्रारूप प्रभाग रचनेत पूर्वी तळवडे प्रभागात असलेला ताम्हाणे वस्ती हा भाग चिखलीला जोडलेला आहे. 2017 मध्ये तळवडेतून राष्ट्रवादीचे 4 नगरसेवक निवडून आले होते. त्यांचे पॅनेल आता "डिस्टर्ब" झाले आहे. प्रभाग सहामधील गावजत्रा मैदान आणि महापालिका हॉस्पिटल हा भाग भोसरी गावठाणात जोडला आहे. या प्रभागातील अनुसूचित जातीची लोकसंख्या कमी केली आहे. त्यामुळे सर्वसाधारण गटासाठी संधी निर्माण झाली आहे. आमदार महेश लांडगे यांच्याकडे या प्रभागातून सर्वसाधारण गटातील तगडे उमेदवार आहेत. प्रभाग 6 चा एसटी आरक्षण प्रभाग 29 मध्ये जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या ठिकाणी असलेले राष्ट्रवादीचे 3 नगरसेवक होते. त्या ठिकाणी राष्ट्रवादीच्या पॅनेलवर परिणाम होणार आहे.

---

# श्रावण हर्डीकर सांभाळणार पीसीएमसीचा कारभार

## शेखर सिंह यांची नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी बदली

। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कार्यकाळ समाप्तीमुळे चर्चेत असलेले पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची मंगळवारी बदली करण्यात आली आहे नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी त्यांची नियुक्ती झाली असून पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार आता श्रावण हर्डीकर सांभाळणार आहेत. दरम्यान हर्डीकर यांची पिंपरी चिंचवडच्या प्रभारी आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तपदी श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती झाल्याचे अप्पर मुख्य सचिव सेवा विराधा यांनी पत्राद्वारे पिंपरी चिंचवड महापालिकेला कळविले आहे. महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तपदी शेखर सिंह यांची 18 ऑगस्ट 2022 रोजी नियुक्ती झाली होती. नियुक्तीपासूनच आयुक्त शेखर सिंह यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली. कथित वाकड टीडीआर घोटाळ्यात सहभाग असल्याच्या आरोपांमुळे ते चौकशीच्या भोवऱ्यात सापडले होते. मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, कुदळवाडी येथे झालेली कारवाई, चिखलीच्या नगररचना (टीपी) योजनेचा भंग, चऱ्होली मधील टीपी कडे दुर्लक्ष अशा अनेक वादग्रस्त मुद्द्यांमुळे त्यांच्या कार्यकाळात त्यांच्यावर टीका झाली. नुकत्याच जाहीर झालेल्या विकास आराखड्यामुळे (डीपी) अनेक नागरिकांचा रोष देखील त्यांनी ओढावून घेतला होता. ग्रीन झोनचे निवासी क्षेत्रात रूपांतर करून बिल्डर लॉबीला फायदा करून दिल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे. जून महिन्यामध्ये भोसरी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा घेण्यात आला होता. यावेळी पुण्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेखर सिंह यांच्या बदलीचे संकेत दिले होते. त्यांचा कार्यकाळ संपत आला आहे. त्यामुळे त्यांची लवकरच बदली होईल असे संकेत पालकमंत्र्यांनी दिले होते अखेर बदली आदेशावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### हर्डीकर यांची प्रभारी आयुक्तपदी नियुक्ती

महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहणाऱ्या श्रावण हर्डीकर यांच्याकडे पिंपरी चिंचवड महापालिकेचा 'प्रभारी' कारभार सोपवण्यात आला आहे. हर्डीकर यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. हर्डीकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील समजले जातात. हर्डीकर यांनी पिंपरी चिंचवडमध्ये कोरोना काळात अतिशय उत्तम कामगिरी केल्याचे उदाहरण आहे. कोरोना संकट काळामध्ये पिंपरी चिंचवड उद्योगनगरी मधील कामगारांना योग्य व्यवस्था पुरवून त्यांच्या स्थलांतराला थांबविण्याचे काम हर्डीकर यांनी उत्तम प्रकारे केले होते. कोरोना काळामध्ये शहरवासीयांना चांगल्या आरोग्यसेवा देण्याबरोबरच कोरोनाला थोपवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. या काळात त्यांनी त्यांच्या उत्तम प्रशासकीय कामकाजाची चुणूक दाखविली होती.



भूमिका

# दळणवळणातून विकासाला 'गतिशक्ती'

**अर्थव्यवस्था अधिकाधिक मजबूत करण्यात दळणवळण क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रात कार्यक्षम, शाश्वत आणि किफायतशीर पर्याय निर्माण करणे ही काळाची गरज आहे. 'पीएम गतिशक्ती योजना' आणि 'राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरण' ही त्या दिशेने टाकलेली पावले आहेत..**

भारत ही २०२५ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था व्हावी, हे उद्दिष्ट गाठण्यासाठी अलीकडच्या वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण आणि सुसंगत पावले उचलली गेली आहेत. यामधील दळणवळण क्षेत्राची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका ओळखून केंद्र सरकारने आर्थिक विस्ताराला आधार देण्यासह, व्यापारउदिमातील स्पर्धात्मकतेला चालना देण्यासाठी आणि देशभरात पुरवठा साखळी सुरळीत करण्याच्या उद्देशाने दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढवण्यावर भर दिला आहे. गुंतवणुकीच्या प्रयत्नांना जोखीममुक्त करण्याबरोबरच, भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून नागरिकांचे राहणीमान सुलभ करणे आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेला चैतन्य देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. गुंतवणुकीच्या जगात गुंतवणूकदारांना नियोजन, अंमलबजावणी, वित्तपुरवठा, प्रशासकीय प्रक्रिया, राजकीय स्थिती, भूसंपादनातील आव्हाने आणि बाजारातील चढउतार



अशा निरनिराळ्या आघाड्यांवर अनेक जोखमींचे सूक्ष्म मूल्यांकन करावे लागते. माहितीपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत नैपुण्य प्राप्त करणे, असंख्य विचारांना एका सुसंगत धोरणात गुंफणे, गुंतवणूक अनुकूल परिस्थिती निर्माण करणे, त्यासाठी मौल्यवान संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक असते. असे असले तरी अशा प्रकारच्या क्षेत्रांमध्ये एखाद्या प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यकाळातील जोखमीचे व्यापक स्तरावरील मूल्यांकन कमी होण्याचे आव्हान कायम असते. संपूर्ण जगभरातील देशांच्या सरकारांनी या प्रयत्नांची निकड ओळखली असून गुंतवणूक परिदृश्य जोखीममुक्त करण्याच्या उद्देशाने सक्रियपणे धोरणे राबविली जात आहेत. या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांमध्ये व्यापारासाठी पोषक वातावरण निर्मिती, धोरणात्मक आणि आर्थिक स्थैर्य राखणे, दळणवळणास प्रोत्साहन देणे, नियमांची चौकट अधिक सोपी करणे, सार्वजनिक-खासगी भागीदारीला चालना देणे आणि आकर्षक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे या गोष्टींचा समावेश आहे.

पायाभूत सेवा क्षेत्र हे वाढत्या अर्थव्यवस्थेचे सार मानले जाते. गुंतवणुकीसाठी ते एक आदर्श क्षेत्र मानले जाते. आर्थिक वृद्धी आणि विकास साध्य करणाऱ्या राष्ट्रांसाठी गुंतवणुकीला चालना देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एक परिवर्तनात्मक दृष्टिकोन म्हणून पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा उपक्रम सुरू केला आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि संपूर्ण भारतात संपर्कयंत्रणा मजबूत करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब करणे हे या उपक्रमाचे उद्देश आहेत. या परिवर्तनाला चालना देणारा आणखी एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स योजना. हे दोन्ही उपक्रम एकत्रितरीत्या भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्रदीर्घ आव्हानांवर तोडगा काढण्यावर आणि क्षमतांचा पुरेपूर वापर करण्यावर भर देतात.ऑक्टोबर २०२१ मध्ये उद्‌घाटन झालेल्या पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद आराखडा (एनएमपी) या उपक्रमाद्वारे रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि अंतर्गत जलवाहतुकीचा समावेश असलेल्या भारताच्या पायाभूत सेवांच्या जाळ्याला आधुनिक स्वरूप देऊन एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून प्रवासी आणि मालाची सुरळीत वाहतूक करणे, संपर्कयंत्रणा सुधारणे आणि वाहतुकीचा खर्च कमी करणे यावर भर दिला जात आहे. बहु-पर्यायी लॉजिस्टिक केंद्र आणि कॉरिडॉरच्या विकासाला प्राधान्य देऊन,.म्हणजे शेवटच्या घटकापर्यंतची संपर्कयंत्रणा सुधारणे आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे दूर करणे. त्यासाठी रस्ते रुंदीकरण, रेल्वेचे विद्युतीकरण आणि बंदरांचे आधुनिकीकरण यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे.

## प्रासंगिक »

### औषधांचे विषप्रयोग!

***बेमुर्वत औषध विक्रेते, बेफिकीर ग्राहक, 'हात ओले' होण्यास उत्सुक नियामक, शास्त्रकाट्याची पर्वा नसलेला समाज असल्यास भेसळयुक्त औषधांनी मरणच ओढवणार...***

मोटारींच्या ब्रेक यंत्रणेत वापरावयाचे द्रावण चार पैसे वाचवण्यासाठी माणसांच्या- त्यातही लहान बालकांच्या- खोकला औषधनिर्मितीत वापरल्यास त्याचा परिणाम काय असेल? या अशा औषध भेसळीच्या घटना एखाद्या समाजात वारंवार घडत असतील तर त्या प्रदेशाच्या शासकीय व्यवस्थेविषयी, नियमन यंत्रणेविषयी काय म्हणता येईल? मध्य प्रदेश आणि आसपास खोकल्याच्या औषधांमुळे झालेले १४-१५ मुलांचे मृत्यू हाच प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित करतात. 'पुन्हा एकदा' म्हणायचे याचे कारण त्या औषधांच्या तशाच भेसळीने आपल्याकडे अनेकदा अनेकांचे प्राण जाण्याचा इतिहास असतानाही वर्तमान त्याच दिशेने थांबवावे यासाठी प्रयत्नही होत नाहीत. राजधानी दिल्ली, आर्थिक राजधानी मुंबई अशा अनेक ठिकाणी अशाच खोकला औषध भेसळीने वर्षानुवर्षे अनेक मृत्यू होत आलेले आहेत.

सध्याच्या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची मुख्य मागणी किमान आधारभूत किंमतीला वैधानिक अधिष्ठान देण्याची आहे. स्वामिनाथन आयोगानेच त्याची शिफारस केली होती. ती व्यवहार्य कशी आहे, याविषयीचे विवेचन. केंद्र सरकारने २०२१मध्ये तीन कृषी कायदे मागे घेतले.

# स्वामिनाथन 'एमएसपी' शेतकऱ्यांना लाभदायी

त्यानंतर आता पुन्हा हजारो शेतकरी सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) कायदेशीर व्हावी आणि प्रा. स्वामिनाथन समितीने मांडलेल्या सूत्रांच्या शिफारशींची अंमलबजावणी व्हावी या मागण्यांसाठी देशाच्या राजधानीकडे जात आहेत.याखेरीज, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, निवृत्तीवेतन योजना तसेच वीज दुरुस्ती विधेयक-२०२० मागे घ्यावे, याही शेतकऱ्यांच्या अपेक्षा आहेत. शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे प्राथमिक उद्दिष्ट स्वामिनाथन समितीच्या शिफारशीनुसार 'एमएसपी' मिळवणे आहे. प्रा.स्वामिनाथन समितीने २००६ मध्ये या शिफारशी मांडल्या. त्यानुसार शेतकऱ्यांना सर्व पिकांसाठी किमान आधारभूत किंमतींची हमी देणारे कायदे व्हायला हवे आहेत. आतापर्यंत सरकारने २३ पिकांसाठी 'एमएसपी' देऊ केली आहे, परंतु तशी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. 'एमएसपी' ही रक्कम सरकारतर्फे शेतकऱ्यांना त्यांनी



पिकवलेल्या पिकांसाठी देण्यात येते. बाजारपेठेतील अस्थिरतेच्या काळात किंवा बाजारातील किमती किमान आधारभूत किमतीच्याही खाली गेल्यानंतर ही किंमत शेतकऱ्यांसाठी सहाय्यक ठरते.सरकारकडून ज्या तेरा खरीप पिकांना 'एमएसपी' दिली जाते त्यात भुईमूग, कापूस, सोयाबीन, तांदूळ, नाचणी, मूग, उडीद, कापूस, सूर्यफूल आणि तीळ यांचा समावेश आहे. सात रब्बी पिके- गहू, बार्ली, हरभरा, मोहरी, करडई आणि तोरिया- यांना अतिरिक्त 'एमएसपी' घोषित करण्यात आली आहे. सध्या सरकार 'एमएसपी' ठरवण्यासाठी ए २+ कौटुंबिक श्रम +५० टक्के अधिक मूल्य सूत्रानुसार निर्णय घेते.

'ए २'मध्ये शेतकऱ्यांनी भाड्याने घेतलेले मजूर व जनावरे, भाड्याची यंत्रसामग्री, बियाणे, कीटकनाशके, खते, अवजारांचे अवमूल्यन, सिंचनशुल्क आणि खेळत्या भांडवलावरील व्याज यांचा समावेश होतो. या घटकांव्यतिरिक्त इतर पिकांची किंमत, अर्थव्यवस्थेची स्थिती आणि कृषी व बिगरकृषी क्षेत्रांमधील व्यापाराच्या अटींचाही सरकार विचार करते.स्वामिनाथन समितीच्या सूचनेनुसार, सरकारने 'एमएसपी' ठरवण्यासाठी सी २+ ५०टक्के अधिक मूल्य याचा विचार करणे अपेक्षित आहे. 'सी २'मध्ये 'ए २'बरोबरच अन्य चार महत्त्वाचे खर्च समाविष्ट आहेत. प्रथम, मालकीच्या स्थिर भांडवली मालमत्तेच्या मूल्यावरील व्याज (जमीन वगळून); दुसरे, मालकीच्या जमिनीचे भाडेमूल्य व भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीसाठीचे भाडे; तिसरे, कौटुंबिक श्रमांचे आरोपित मूल्य आणि चौथे, एकूण खर्चाच्या दहा टक्के व्यवस्थापनसामग्रीचे मूल्य.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## विरोधकांचा आक्षेप काय?

## ३१,६२८ कोटीची आर्थिक मदत केल्याची घोषणा

# शेतकऱ्यांच्या मदतीत आकड्यांचा खेळ

## ६,१७५ कोटी रुपयांची वाढीव मदत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील अतिवृष्टीग्रस्तांना ३१,६२८ कोटी रुपयांची आर्थिक मदत केल्याची घोषणा करण्यात आली असली तरी हा आकड्यांचा खेळ असल्याचा आक्षेप विरोधी पक्ष, शेतकरी संघटनांनी घेतला आहे. राष्ट्रीय आपत्ती मदत निधीच्या (एनडीआरएफ) निकषांपेक्षा फक्त ६,१७५ कोटी रुपयांची वाढीव मदत मिळणार आहे.**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फार अत्यंत आकर्षकपणे आर्थिक मदतीची घोषणा केली. एकूण ३१,६२८ कोटी रुपयांमध्ये यापूर्वी मदत दिलेल्या २२०० कोटी रुपयांच्या निधीचा ही समावेश आहे. नव्या निकषांनुसार प्रति हेक्टरी कोरडवाहू शेतीला १८,५००, बागायती शेतीला २७,००० आणि बहुवार्षिक शेतीला ३२,५०० रुपये मिळणार आहे. म्हणजे एका गुंठ्याला (आर) कोरडवाहू शेतीला १८५ रुपये, बागायती शेतीला २७० रुपये आणि बहुवार्षिक शेतीला ३२५ रुपये मिळणार आहेत. आज शेतमजूर दिवसाला ५०० रुपये मजुरी घेतो, म्हणजे शेतकऱ्याला एका दिवसांच्या मजुरी इतकी ही मदत मिळणार नाही.राज्यात तब्बल ६० हजार एकर जमीन खरडून गेली आहे. खरडून गेलेल्या जमिनीला प्रति हेक्टरी ४७,००० रुपये आणि मनरेगातून ३ लाख रुपये मिळणार आहेत. खरडून गेलेल्या जमिनीत धरणांचा गाळ भरणे अपेक्षित आहे. पण, भरलेली धरणे रिकामी होण्यास एप्रिलअखेर वाट पाहावी लागणार आहे. शिवाय मनरेगातून मजुरांद्वारे काम करून घ्यावे लागणार आहे. शिवाय आजवरचा अनुभव पाहता केंद्र सरकारकडून मनरेगाचा निधीही वेळेत येत नाही. त्यामुळे खरडून गेलेल्या जमिनीत किमान वर्षभर पिके घेणे शक्य होणार नाही.मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना फक्त पीक नुकसानीपोटी १८ हजार कोटी रुपये दिले जातील, असे जाहीर केले आहे. यापूर्वीच्या एनडीआरएफच्या निकषांनुसार सुमारे १२ हजार कोटी रुपये मिळाले असते, ते आता सहा हजार कोटी रुपयांनी वाढून १८ हजार कोटी रुपये मिळणार आहेत.राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेत सहभाग घेतला आहे. त्यापैकी पीक कापणी प्रयोग झाल्यानंतर सुमारे पाच ते आठ हजार कोटी रुपयांची मदत मिळेल, असे सरकारने म्हटले आहे.

पण, मुळात राज्यात सरासरी उंबरठा उत्पादन कमी आहे. सरासरी उत्पादन जिल्हा, तालुकानिहाय भिन्न आहे. गत तीन वर्षांत काहीना काही कारणांमुळे उत्पादनात घट झाली आहे, त्यामुळे पीकविमा योजनेचे पैसे कधी आणि किती मिळतील याचा नेम नाही, असे मत आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केले आहे.महापुरात हजारो दुभत्या गायी आणि म्हशींचा मृत्यू झाला आहे. दुधाळ गायी, म्हशींची किंमत एक ते दीड लाख रुपयांवर गेली आहे. मात्र, एका मृत गायीपोटी सरकार फक्त ३७,५०० रुपये देणार आहे.

या एकच दिलासा आहे, यापूर्वी एका शेतकऱ्यांच्या तीन गायींच मदत मिळत होती, आता मृत सर्व जनावरांना मदत मिळणार आहे. पण, मिळणारी मदत तोकडी आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण गोठेच पाण्याखाली गेल्यामुळे गोठ्यातील सर्व जनावरे मृत्यू पावली आहेत. त्यामुळे बाजारभावानुसार मदत मिळावी, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीमध्ये सरकारने मोठी चालाखी केली आहे. ३१,६२८ कोटी रुपयांपैकी केवळ ६५०० कोटी रुपये इतकीच नवी मदत आहे. बाकी सर्व मदत राष्ट्रीय आपत्ती निधीच्या निकषांनुसारच आहे. शेती कर्जाविषयी काहीही भाष्य केलेले नाही. मनरेगाचा निधी मिळणे शक्य नाही. कर्जमाफीच्या मागणीला पुन्हा बगल दिली आहे, असे मत अखिल भारतीय किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी व्यक्त केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फार अत्यंत आकर्षकपणे आर्थिक मदतीची घोषणा केली. एकूण ३१,६२८ कोटी रुपयांमध्ये यापूर्वी मदत दिलेल्या २२०० कोटी रुपयांच्या निधीचा ही समावेश आहे.

### पिकविम्याचे पैसे मिळणे कठीण

शेतीला १८,५००, बागायती शेतीला २७,००० आणि बहुवार्षिक शेतीला ३२,५०० रुपये मिळणार आहे. म्हणजे एका गुंठ्याला (आर) कोरडवाहू शेतीला १८५ रुपये, बागायती शेतीला २७० रुपये आणि बहुवार्षिक शेतीला ३२५ रुपये मिळणार आहेत. आज शेतमजूर दिवसाला ५०० रुपये मजुरी घेतो, म्हणजे शेतकऱ्याला एका दिवसांच्या मजुरी इतकी ही मदत मिळणार नाही.

# शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याची शक्यता

## पीक कापणीच्या प्रयोगात सोयाबीनला अवघा दोन क्विंटलचा उतारा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोयाबीनचा हेक्टरी आठ ते बारा क्विंटलपर्यंत मिळणारा उतारा अतिवृष्टीमुळे आता कमालीचा घटला आहे. जिल्ह्यात झालेल्या पहिल्याच पीककापणी प्रयोगात सोयाबीनला हेक्टरी दोन क्विंटल एक किलोचाच उतारा आला आहे. त्यामुळे पीकविमा कंपनीकडून विमा मंजूर होण्याची अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.**

हेक्टरी दोन क्विंटल एक किलोचा उतारा मिळाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी दिली.कळमनुरी तालुक्यातील चिखली येथे कृषी विभाग, महसूल विभाग व पंचायत विभागाच्या उपस्थितीत मंडळामध्ये प्रत्येकी चार ठिकाणी विविध पिकांचे पीककापणी प्रयोग घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार सोमवारी चिखली येथील नागोराव भाऊराव चव्हाण या शेतकऱ्याच्या शेतात प्रयोग घेण्यात आला. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आमदार संतोष बांगर, उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते यांच्यासह विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी झालेल्या पीककापणी प्रयोगामध्ये सोयाबीनचे उतारा हेक्टरी दोन क्विंटल एक किलो आल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी सांगितले. याशिवाय सोयाबीनचे दाणेही काळे पडले असून, पूर्ण भरले नसल्याचे दिसून आले. त्यामुळे पहिल्याच पीक कापणी प्रयोगातून अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याचे स्पष्ट अधोरेखित झाले. जिल्ह्यात खरीप हंगामात २.५० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली होती, त्या पाठोपाठ सुमारे ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड झाली. परंतु या वर्षी पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील सर्वच पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नदी, नाल्याकाठच्या जमिनी, तर पुराच्या पाण्यात पिकासह खरडून वाहून गेल्या. जिल्ह्यात सुमारे ३ लाखांवर शेतकऱ्यांनी पीक विमा काढला होता. बाधित शेतकऱ्यांचे लक्ष विमा कंपनीच्या निर्णयाकडे लागले.पीककापणी प्रयोगानंतर येणाऱ्या उत्पन्नावर आधारित विमा मिळणार आहे. त्यामुळे असे प्रयोग सर्वच ठिकाणी घेतले जावेत, अशा स्पष्ट सूचना पालकमंत्री नरहरी झिरवाळ, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी विमा कंपनीला केल्या होत्या.



### उत्पादकता हेक्टरी बारा क्विंटल

कंपन्यांना कडक शब्दांमध्ये इशारा दिला होता.जिल्ह्यात सोयाबीन पिकाची उत्पादकता हेक्टरी बारा क्विंटल असून, जोखीमस्तराची उत्पादकता हेक्टरी साडेआठ क्विंटल आहे. मात्र या वर्षी केवळ हेक्टरी दोन क्विंटल उत्पादन येत असल्याने पीकविमा कंपनीला आता शेतकऱ्यांना पीकविमा द्यावा लागेल.

**पुतिनशी फोनवरून संवाद**

## पंतप्रधान मोदींचा राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना फोन

# भारत-रशिया संबंध आणखी दृढ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादल्यानंतर भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, असं असतानाच दुसरीकडे भारत आणि रशियामधील संबंध आणखी दृढ होत असल्याचं दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत.**

## पुतिन लवकरच भारत दौऱ्यावर



दरम्यान, यातच आता भारताचे पंतप्रधान मोदी यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधत त्यांना ७३ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.माझे मित्र राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी बोललो आणि त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. गेल्या काही वर्षांत भारत-रशिया संबंध अधिक दृढ करण्याच्या त्यांच्या वैयक्तिक वचनबद्धतेचं मनापासून कौतुक करतो," असं पंतप्रधान मोदी यांनी एक्स (ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध ताणलेले आहेत. यादरम्यान भारत आणि रशिया यांच्यातील संबंध आणखी मजबूत झाल्याचं दिसून येत आहे. व्लादिमीर पुतिन यांनी ते लवकरत भारताच्या दौऱ्यावर येणार असल्याची पुष्टी काही दिवसांपूर्वीच केलेली आहे. पुतिन हे या वर्षी डिसेंबरमध्ये भारतात येणार असल्याची बातमी समोर आली होती. यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना पुतिन यांनी ते या दौऱ्यासाठी आणि त्यांचे 'प्रिय मित्र' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी उत्सुक आसल्याचंही म्हटलेलं आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादल्यानंतर भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, असं असतानाच दुसरीकडे भारत आणि रशियामधील संबंध आणखी दृढ होत असल्याचं दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत

दरम्यान, यातच आता भारताचे पंतप्रधान मोदी यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधत त्यांना ७३ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे

.माझे मित्र राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी बोललो आणि त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. गेल्या काही वर्षांत भारत-रशिया संबंध अधिक दृढ करण्याच्या त्यांच्या वैयक्तिक वचनबद्धतेचं मनापासून कौतुक करतो," असं पंतप्रधान मोदी यांनी एक्स (ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध ताणलेले आहेत. यादरम्यान भारत आणि रशिया यांच्यातील संबंध आणखी मजबूत झाल्याचं दिसून येत आहे. व्लादिमीर पुतिन यांनी ते लवकरत भारताच्या दौऱ्यावर येणार असल्याची पुष्टी काही दिवसांपूर्वीच केलेली आहे. पुतिन हे या वर्षी डिसेंबरमध्ये भारतात येणार असल्याची बातमी समोर आली होती. यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना पुतिन यांनी ते या दौऱ्यासाठी आणि त्यांचे 'प्रिय मित्र' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी उत्सुक आसल्याचंही म्हटलेलं आहे.पंतप्रधान मोदी यांनी एक्स (ट्विटर) वरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध ताणलेले आहेत. यादरम्यान भारत आणि रशिया यांच्यातील संबंध आणखी मजबूत झाल्याचं दिसून येत आहे.

### नरेंद्र मोदींनी काय म्हटलं?

पुतिन हे या वर्षी डिसेंबरमध्ये भारतात येणार असल्याची बातमी समोर आली होती. यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना पुतिन यांनी ते या दौऱ्यासाठी आणि त्यांचे 'प्रिय मित्र' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी उत्सुक आसल्याचंही म्हटलेलं आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादल्यानंतर भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# बिहारमध्ये भाजपाचं गणित बिघडणार?

## चिराग पासवान यांच्याविषयी काय म्हणाले प्रशांत किशोर?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित बिहार निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेत करण्यात आली. बिहार निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. राज्यात दोन टप्प्यांत निवडणुका होतील. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होईल आणि १४ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.**




बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीची तयारी जोरात सुरू आहे. विविध राजकीय पक्ष निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत. नितीश कुमार, तेजस्वी यादव, प्रशांत किशोर आणि चिराग पासवान हे बिहारच्या राजकारणातील प्रमुख चेहरे आहेत. आता चिराग पासवान आणि प्रशांत किशोर यांच्या युतीची चर्चा सुरु आहे. सूत्रांनी याविषयी माहिती दिली आहे. त्यामुळे, बिहारमधील भाजपाचे गणित बिघडेल का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.मी डाळ-भात खाणारा व्यक्ती आहे, खिचडी खाणारा नाही. मी खिचडी खात नाही आणि बनवत सुद्धा नाही. चिराग पासवान यांचे मी नेहमीच कौतुक केले आहे आणि अजूनही करतो, कारण ते बिहारमध्ये धर्म आणि जातीचे राजकारण करत नाहीत."प्रशांत किशोर पुढे म्हणाले, "परंतु,चिराग पासवान भाजपाबरोबर लढत आहेत. चिराग पासवान बिहारबद्दल बोलतात पण त्यासाठी उभे राहत नाहीत. त्यांना २० जागा मिळतील की २५ जागा मिळतील, हे आम्हाला माहित नाहीकितीही जागा मिळाल्या. तरी ते आणि आम्ही आमने-सामने असू. मग, इथे तडजोड करण्याचा प्रश्नच कुठे येतो?," असे ते म्हणाले .

### युती होणे शक्य का नाही?

महत्त्वाकांक्षेला धक्का लागण्याची शक्यता आहे. बिहार विधानसभेत बहुमताचा आकडा १२२ आहे. भारतीय जनता पक्ष, मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड आणि विरोधी गटातून २०२० च्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय जनता दलाकडून (आरजेडी) इतक्या जागा खेचून आणणे, संभाव्य एलजेपी-जन सुराज युतीसाठी खूप मोठे आव्हान असेल.

# जान्हवी कपूरचं टी-शर्ट पाहिलंत का?



जान्हवी कपूर आणि शिखर पहारिया यांचे नाते बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. त्यांच्या डेट नाईट्सपासून अनेक गोष्टी नेहमी चर्चेत असतात. जान्हवी कपूर अनेक मुलाखतींमध्ये तिचा प्रियकर शिखर पहारिया विषयी भरभरून बोलते. काही दिवसांपूर्वी जान्हवी कपूरने 'शिकू' नावाचा नेकलेस परिधान केला होता. आता जान्हवीने शिखरच्या नावाचे टीशर्ट घातले असून त्यावर त्याचा फोटो असल्याचे दिसत आहे. हा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. व्हायरल झालेला फोटो हा नाशिकमधील एका हॉटेलचा असून जान्हवी कपूर एका सिनेमाच्या शूटिंगसाठी येथे आली होती. तिच्या बरोबर या सिनेमात वरूण धवन सुद्धा दिसणार आहे.सोशल मीडियावर जान्हवीच्या व्हायरल झालेल्या फोटोमध्ये वरूण आणि ती दिसत असून यात नाशिकमधील हॉटेलचे कर्मचारी दिसत आहे. जान्हवी आणि वरुण दोघे त्यांचा आगामी चित्रपट 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'च्या चित्रीकरणासाठी नाशिकमध्ये आले होते. मात्र, या फोटोमध्ये सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते म्हणजे जान्हवीने परिधान केलेल्या टी-शर्टने. या खास टी-शर्टवर तिच्या प्रियकर शिखर पहारिया याचे नाव आणि त्याचा फोटो प्रिंट केला होता. हा फोटो हॉटेलच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर करण्यात आला होता. त्याच्या कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिले ,"आमच्यासाठी हा एक अभिमानाचा क्षण होता की आम्हाला बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कलाकार जान्हवी कपूर आणि वरूण धवन यांचा पाहुणचार करता आला. हा क्षण आमच्यासाठी 'पिंच अस' मूव्हमेंटसारखा होता."जान्हवीने यापूर्वीही तिचा प्रियकर शिखरसाठी तिचे प्रेम जाहीरपणे व्यक्त केले आहे. यावर्षी एप्रिल (२०२४) महिन्यात तिचे वडील बोनी कपूर यांच्या 'मैदान' चित्रपटाच्या स्क्रीनिंगदरम्यान तिने शिखरच्या नावाचा खास नेकलेस घातला होता.

# अमिताभ बच्चन यांनी फक्त एक रुपया मानधनावर केलं होतं 'मोहब्बतें'मध्ये काम

बॉलीवूडमध्ये असे अनेक चित्रपट आहेत, जे बॉक्स ऑफिसवर जोरदार हिट झालेत. ९० च्या दशकात आलेला 'मोहब्बतें' चित्रपट आजही अनेक प्रेक्षकांच्या आवडीचा आहे. या चित्रपटाची कथा आणि सर्वच कलाकारांचा उत्तम अभिनय यांमुळे लाखो चाहत्यांना आजही हा चित्रपट पुन्हा पुन्हा पाहावासा वाटतो. चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी नारायण शंकर हे पात्र साकारलं होतं. पण, तुम्हाला माहितीये का? या चित्रपटात काम करण्यासाठी अमिताभ बच्चन यांनी फक्त एक रुपया इतकच मानधन घेतलं होतं.चित्रपट निर्माते निखिल अडवाणी यांनी नुकतीच 'रेडिओ मिर्ची'ला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी सिनेविश्वातील सध्याचं वातावरण आणि आधीचं वातावरण यात नेमका कसा फरक



आहे, यावर वक्तव्य केलं आहे. तसेच या दोन काळांमधील फरक सांगताना त्यांनी अमिताभ बच्चन यांचं एक उदाहरणसुद्धा दिलं आहे.मुलाखतीमध्ये निखिल अडवाणी यांना सिनेसृष्टीतील आधीचा काळ आणि आताचा काळ कसा आहे, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, "आधीच्या व्यक्तींमध्ये प्रेम आणि माया होती. त्या काळी चित्रपट नात्यातील विश्वास आणि ताकद यांच्या आधारे बनवले जात होते.यावेळी निखिल अडवाणी यांनी अमिताभ बच्चन यांचा किस्सा सांगितला. ते म्हणाले, "माझ्या सिनेविश्वातील कारकिर्दीच्या काळात मी, सुरुवातीला 'यशराज फिल्म्स'बरोबर काम करत होतो. त्यावेळी अमिताभ बच्चन यांना यश चोप्रा यांनी सिलसिला या चित्रपटात काम करण्याची ऑफर दिली. त्यावेळी मानधन म्हणून तुला किती पैसे हवेत, असं त्यांनी विचारलं.

# ती प्रेमळ स्वभावाची आहे

बॉलीवूड अभिनेत्री नर्गिस फाखरीचे नाव सध्या चर्चेत आहे, याचे कारण म्हणजे तिची बहीण आलिया फाखरीचे नाव तिचा एक्स बॉयफ्रेंड एडवर्ड जेकब्सच्या हत्येच्या आरोपांमध्ये समोर आले आहे. नर्गिसने या चर्चेदरम्यान पहिल्यादांच सोशल मीडियावर पोस्ट केली असून ही पोस्ट व्हायरल होत आहे. नर्गिसने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे. त्या स्टोरीत नर्गिसने फोटो पोस्ट केला असून त्याला एक लहानसे कॅप्शन दिले आहे.स्टोरीवर शेअर केलेल्या या फोटोमध्ये ती 'हाउसफुल ५'मधील सोनम बाजवा आणि जॅकलीन फर्नांडिस या दोन अभिनेत्रींबरोबर दिसत आहे. या फोटोसह तिने "आम्ही येतोय!" अशी कॅप्शन दिली आहे. 'हाऊसफुल ५'मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख, फरदीन खान यांच्यासह अनेक कलाकार झळकणार आहेत. हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे. हा चित्रपट ६ जून २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून याचे दिग्दर्शन तरुण मनसुखानी करत आहेत. नर्गिस फाखरीच्या बहिणीवर तिच्या पूर्वाश्रमीचा प्रियकर एडवर्ड जेकब्सच्या हत्येचा आरोप आहे. तिला अमेरिकेतील रायकर्स आयलंड, न्यूयॉर्क येथे अटक करण्यात आली आहे.



# तुमचे वय झाले आहे

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखले जाणारे अभिनेते अमिताभ बच्चन सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टींमुळे चर्चेत असतात. सध्या ते कौन बनेगा करोडपती या लोकप्रिय शोचे सूत्रसंचालन करताना दिसत आहेत. या कार्यक्रमात ते प्रेक्षकांबरोबर अनेक गोष्टी, किस्से शेअर करत असतात. याबरोबरच, ते तंत्रज्ञानाबरोबर स्वत:ला अपडेट ठेवताना दिसतात. आता नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एका एपिसोडमध्ये बीग बींनी त्यांना जर गॅजेटसंबंधी काही प्रश्न पडले असतील तर ते त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना मदतीसाठी बोलवतात. त्यांची नातवंडे तसेच मुलगा अभिषेक यांची ते मदत घेतात.कौन बनेगा करोडपती' या शोमध्ये एका स्पर्धकाबरोबर बोलताना अमिताभ बच्चन यांनी म्हटले, "आपल्याला एखादा प्रश्न पडला तर त्याचवेळी आपल्याला उत्तर पाहिजे असते.

# बॉलीवूडमध्ये गटबाजी, 15 महिने काम नव्हतं

विवेक ओबेरॉयने २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कंपनी' चित्रपटातून मनोरंजन विश्वात पदार्पण केलं. यानंतर आलेल्या 'साथिया' चित्रपटात विवेक प्रेक्षकांना एका रोमँटिक हिरोच्या भूमिकेत पाहायला मिळाला. पण, बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेत अनेकदा कलाकारांना कठीण प्रसंगाचा सामना करावा लागतो. प्रचंड मेहनत घेऊनही विवेकला अनेक वर्षे फिल्म इंडस्ट्रीपासून दूर राहावं लागलं. यानंतर अभिनेत्याने मनोरंजन विश्वापासून पूर्णपणे ब्रेक घेत आपलं नशीब एका नव्या क्षेत्रात आजमावलं. उत्तम अभिनयाबरोबरच आजच्या घडीला विवेक ओबेरॉय आघाडीचा व्यावसायिक म्हणून ओळखला जातो.विवेकने नुकतीच 'इंडियन एक्स्प्रेस'च्या 'स्क्रीन'ला मुलाखत दिली, यावेळी त्याने त्याच्या 'चॉकलेट बॉय' इरापासून, पुढे बॉलीवूडमधला संघर्ष ते यशस्वी व्यावसायिक असा सगळा प्रवास उलगडून सांगितला आहे.विवेकम्हणाला, "मी माझ्या करिअरच्या गेल्या २२ वर्षांमध्ये जवळपास ६७ प्रोजेक्ट्समध्ये काम केलंय. पण, या इंडस्ट्रीबाबत तुम्ही कोणत्याही प्रकारची शाश्वती देऊ शकत नाही. तुम्ही उत्तम काम करता, पुरस्कार जिंकता, आपलं काम व्यवस्थित मन लावून करता, एक अभिनेता म्हणून तुम्ही सगळ्या गोष्टी करता पण, इतकं सगळं करूनही तुम्हाला काही क्षुल्लक आणि वेगळ्याच कारणांनी काम दिलं जात नाही. २००७ मध्ये मी 'शूटआउट अॅट लोखंडवाला' या सिनेमात काम केलं होतं आणि त्यातलं 'गणपत...' हे गाणं प्रचंड व्हायरल झालं.

## ऑस्ट्रेलियाने जाहीर केला संघ

## मिचेल स्टार्कचं ऑस्ट्रेलिया संघात पुनरागमन

# भारतीय करणार स्टार्कचा सामना

## जोश इंगलिसचं संघात पुनरागमन




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताविरुद्धच्या वनडे आणि टी२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाने संघाची घोषणा केली असून, अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचं संघात पुनरागन झालं आहे. जवळपास वर्षभरानंतर स्टार्क वनडे खेळणार आहे. मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज मार्नस लबूशेनला संघातून वगळण्यात आलं आहे. लबूशेनचा क्वीन्सलँड संघातील सहकारी मॅट रेनशॉला वनडे संघात समाविष्ट करण्यात आलं आहे. रेनशॉने याआधी फक्त कसोटीत ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व केलं आहे.**

लबूशेन गेल्या १० वनडे डावात धावांसाठी संघर्ष करत होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत मॅट शॉर्ट दुखापतग्रस्त झाल्याने लबूशेनला संधी मिळाली मात्र त्याला या संधीचा फायदा उठवता आला नाही. वनडे संघातून डच्चू देण्यात आल्याने लबूशेन अॅशेस मालिकेसाठी शेफील्ड शिल्डचे सामने खेळून तयारी करू शकतो.

रेनशॉने ऑस्ट्रेलिया ए संघासाठी खेळताना सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. सध्या तो मधल्या फळीत खेळत आहे मात्र अॅशेस मालिकेसाठी त्याचा सलामीवीर म्हणून विचार होऊ शकतो. कसोटी पदार्पणानंतर जवळपास दशकभरानंतर रेनशॉला वनडे पदार्पणाची संधी आहे. २०२२ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी त्याला संघात सामील करण्यात आलं होतं मात्र अंतिम अकरात संधी मिळाली नव्हती.पोटऱ्यांना झालेल्या दुखापतीतून सावरलेल्या जोश इंगलिसचं संघात पुनरागमन झालं आहे. अॅलेक्स कॅरे शेफील्ड शिल्डचा सामना खेळणार असल्यामुळे पहिली लढत खेळणार नाही. मनगटाला झालेल्या दुखापतीमुळे ग्लेन मॅक्सवेलचा टी२० मालिकेसाठी विचार करण्यात आला नाही. कॅमेरुन ग्रीन वनडे मालिकेत खेळणार आहे पण टी२० मालिकेसाठी त्याच्या नावाचा विचार झालेला नाही. आगामी अॅशेस मालिकेच्या पार्श्वभूमीवर बहुतांश खेळाडूंसाठी वर्कलोड मॅनेजमेंट करण्यात आलं आहे. इंडिया ए संघाविरुद्ध चांगली कामगिरी करणाऱ्या कूपर कोनोलीने वनडे संघातलं स्थान कायम राखलं आहे. मिचेल ओवेनलाही वनडे पदार्पणाची संधी आहे. पुढच्या वर्षी होणारा टी२० वर्ल्डकप लक्षात घेऊन संघाची रचना करण्यात आली आहे. खेळाडूंना दुखापतीतून सावरण्यासाठी पुरेसा वेळ देण्यावर भर दिला आहे असं निवडसमितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी सांगितलं. भारतीय संघ या दौऱ्यात ३ वनडे आणि ५ टी२० सामने खेळणार आहे.भारतानेही काही तासांपूर्वी संघनिवड जाहीर केली. भारताच्या वनडे संघाचं नेतृत्व शुबमन गिलकडे सोपवण्यात आलं आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली हे दोघेही संघात आहेत. श्रेयस अय्यर उपकर्णधार असणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली २०२७ वनडे वर्ल्डकप खेळणार का यासंदर्भात स्पष्टता नाही. टेस्ट संघाचं नेतृत्व सोपवण्यात आलेला शुबमन आता वनडेतही संघाची धुरा सांभाळणार आहे. या मालिकेतील पहिला वनडे सामना १९ ऑक्टोबरला पर्थच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. तर मालिकेतील दुसरा सामना २३ ऑक्टोबरला अॅडिलेडच्या मैदानावर रंगणार आहे. तर मालिकेतील शेवटचा सामना २५ ऑक्टोबरला सिडनीच्या मैदानावर खेळवला जाईल.वनडे मालिका झाल्यानंतर दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे. टी-२० मालिकेतील पहिला सामना २९ ऑक्टोबरला कॅनबरामध्ये खेळवला जाईल. तर दुसरा सामना ३१ ऑक्टोबरला मेलबर्नमध्ये, तिसरा सामना २ नोव्हेंबरला होबार्टमध्ये, चौथा सामना ६ नोव्हेंबरला गोल्ड कोस्टमध्ये आणि मालिकेतील शेवटचा टी-२० सामना ८ नोव्हेंबरला ब्रिसबेनमध्ये खेळवला जाणार आहे.लबूशेन गेल्या १० वनडे डावात धावांसाठी संघर्ष करत होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत मॅट शॉर्ट दुखापतग्रस्त झाल्याने लबूशेनला संधी मिळाली.

### ओवेनलाही पदार्पणाची संधी

मात्र त्याला या संधीचा फायदा उठवता आला नाही. वनडे संघातून डच्चू देण्यात आल्याने लबूशेन अॅशेस मालिकेसाठी शेफील्ड शिल्डचे सामने खेळून तयारी करू शकतो. रेनशॉने ऑस्ट्रेलिया ए संघासाठी खेळताना सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. सध्या तो मधल्या फळीत खेळत आहे मात्र अॅशेस मालिकेसाठी त्याचा सलामीवीर म्हणून विचार होऊ शकतो.

## मुंबई विरुद्ध महाराष्ट्र सामन्यात तुफान राडा

## पृथ्वी शॉने स्वतःवरील नियंत्रण गमावल्याचं पाहायला मिळालं




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रणजी चषक २०२५-२६ सुरू होण्याआधी मुंबई व महाराष्ट्राच्या संघात पुण्यामध्ये आजपासून (मंगळवार, ७ ऑक्टोबर) सराव सामन्याला सुरुवात झाली आहे. या सराव सामन्याच्या पहिल्याच दिवशी मैदानात मोठा गोंधळ पाहायला मिळाला. या सामन्यात महाराष्ट्राकडून खेळणारा पृथ्वी शॉ रागाच्या भरात त्याच्या जुन्या सहकाऱ्यावर धावून गेला. पृथ्वी शॉ बॅट घेऊन मुशीर खानच्या मागे धावत गेला.**

पृथ्वी शॉने स्वतःवरील नियंत्रण गमावल्याचं पाहायला मिळालं. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. आठ वर्षे मुंबईकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा पृथ्वी शॉ सध्या महाराष्ट्राच्या संघाकडून खेळत आहे. आज मुंबईविरोधात खेळवण्यात आलेल्या सराव सामन्याच्या पहिल्या दिवशी त्याने २१९ चेंडूत १८१ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. रणजी चषक २०२५-२६ च्या आधी खेळवण्यात आलेल्या या सराव सामन्यावेळी शॉने त्याची ताकद दाखवून दिली. त्याने मैदानाच्या प्रत्येक कोपऱ्यात फटके लगावले. पृथ्वी शॉने १४० चेंडूत शतक झळकावलं. १८१ धावांवर खेळत असताना त्याने एक मोठा फटका लगावला. मात्र, सीमारेषेजवळ उभ्या मुशीर खान याने झेल टिपला आणि पृथ्वी शॉची वादळी खेळी संपुष्टात आणली. त्यानंतर पृथ्वी व मुशीरमध्ये मैनादातच राडा झाल्याचं पाहायला मिळालं.बाद झाल्यानंतर पृथ्वी शॉ पव्हेलियनच्या दिशेने चालू लागला होता. त्याचवेळी त्याच्यात व मुशीर खानमध्ये बाचाबाची झाली. त्याने बॅट उगारली मात्र मुशीर व त्याच्यामध्ये बरंच अंतर होतं त्यामुळे बॅट मुशीरला लागली नाही.

### मैदानावर नेमकं काय घडलं?

पंच देखील तिथे आले आणि त्यांनी स्थिती नियंत्रणात आणली. पंच पृथ्वी शॉला बाजूला घेऊन गेले, तर मुंबईचे खेळाडू मुशीर खानला दुसऱ्या बाजूला घेऊन गेले आणि मैदानावरील हा वाद मिटला.मुशीर खान हा भारतीय संघातील खेळाडू सर्फराज खान याचा धाकटा भाऊ आहे. त्याने याआधी १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचं प्रतिनिधीत्व केलं आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार।
। दि. 8 ऑक्टोबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## आकुर्डी, डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या

# पार्थ काटे याची चमकदार कामगिरी!

### शिक्षण विश्व : उल्लेखनीय यशामुळे पार्थची झोनल स्पर्धेसाठी निवड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी :आकुर्डी, डी. वाय. पाटील महाविद्यालयातील बीटेक सिव्हिल शाखेतील विद्यार्थी पार्थ काटे याने शारदाबाई आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती येथे पार पडलेल्या एसपीपीयू आंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत चमकदार कामगिरी केली.**



आकुर्डी येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी पार्थ काटे याने जलतरण क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. शारदाबाई आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU) आंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत पार्थने तीन पदकांची झेप घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या स्पर्धेत पार्थने २०० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये सुवर्णपदक, ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक, तसेच २०० मीटर मेडली प्रकारात कांस्यपदक पटकावून आपली विजयी कामगिरी सिद्ध केली. त्याच्या या तिहेरी यशामुळे केवळ महाविद्यालयाचा नव्हे तर संपूर्ण पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या उल्लेखनीय यशामुळे पार्थची आता झोनल (क्षेत्रीय) जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली असून, पुढील काही आठवड्यांत होणाऱ्या या स्पर्धेसाठी तो महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्याच्या कामगिरीचे कौतुक करत महाविद्यालयात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयाचे विश्वस्त तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), प्राचार्य डॉ. पी. मालाथी, प्रशासन डीन डॉ. एस. एस. सरनोबत, तसेच क्रीडा संचालक प्रा. आबाजी माने यांनी पार्थचे विशेष अभिनंदन केले. "पार्थने क्रीडाक्षेत्रात केलेली कामगिरी आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्रातही चमक दाखवावी, हेच आमच्या संस्थेचे ब्रीद आहे," असे या सर्व मान्यवरांनी नमूद केले.

प्रा. आबाजी माने यांनी सांगितले, "पार्थ काटेने गेल्या काही महिन्यांपासून प्रचंड मेहनत घेतली आहे. सकाळ-संध्याकाळ सराव, योग्य आहार आणि फिटनेसवर त्याने लक्ष केंद्रित केले. त्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना आता यश मिळाले आहे. झोनल स्तरावर तो आणखी चांगली कामगिरी करेल, असा आम्हाला विश्वास आहे."

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मालाथी यांनी सांगितले की, "डी. वाय. पाटील संस्था नेहमीच विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहित करते. पार्थने दाखवून दिले की, समर्पण आणि शिस्त यांच्या बळावर कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्टता साधता येते."

कॅम्पस डायरेक्टर रिअर ॲडमिरल अमित विक्रम यांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत म्हटले की, "क्रीडा हे केवळ शारीरिक क्षमतेचे नव्हे तर मानसिक बळाचेही द्योतक आहे. पार्थसारखे विद्यार्थी आपल्या प्रयत्नांनी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचवतील, अशी आम्हाला खात्री आहे."

विश्वस्त तेजस पाटील यांनी पार्थच्या कामगिरीचे कौतुक करत सांगितले की, "विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही सहभाग घ्यावा. पार्थने त्याचे उत्कृष्ट उदाहरण ठेवले आहे. झोनल स्पर्धेतही तो सुवर्ण कामगिरी करेल, अशी अपेक्षा आहे." पार्थच्या या यशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सोशल मीडियावर विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन करत "पार्थ काटे – द गोल्डन बॉय ऑफ डीवायपी!" अशी पोस्ट्स शेअर केल्या आहेत. आता पार्थ झोनल स्पर्धेसाठी सज्ज झाला असून, पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करत राज्यस्तरीय यश मिळविण्याचा निर्धार त्याने व्यक्त केला आहे. त्याच्या या कामगिरीमुळे डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी हे केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडाक्षेत्रातही अग्रगण्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षिसासाठी एक कोटींचा खर्च

### आमदार महेश लांडगे यांचा आणखी एक "सर्जिकल स्ट्राईक"

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली-मोशी शिवरस्त्यावरील वाढत्या वाहतुकीचा ताण अखेर कमी होणार आहे. भूमिपुत्र-जागामालक आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने या भागाला वाहतुकीचा पर्यायी मार्ग मिळाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून गेल्या 1997 पासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम एका रात्रीत सुरू करण्यात आले. वाहतूक सक्षमीकरणासाठी केलेल्या या "सर्जिकल स्ट्राईक"बाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया येत आहेत.**

चिखली, मोशी, बोऱ्हाडेवाडी परिसरात वाढती लोकसंख्या आणि रहदारीमुळे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर वाहतूक सक्षमीकरणासाठी स्थायी उपाययोजना करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यासाठी पर्यायी रस्ते, डीपी रस्ते विकसित करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

मोशी- बोऱ्हाडेवाडी येथील वुड्सविले फेज-वन, कुमार प्रिन्सविले, स्वराज सोसायटी या परिसरातून जाणाऱ्या रस्त्याचे काम वेगाने सुरु झाले असून, या मार्गामुळे शिवरस्त्यावरील वाहतुकीचा बोजा लक्षणीय प्रमाणात कमी होणार आहे. या रस्त्यासाठी लागणारी खासगी जागा सामाजिक भावनेतून बोराटे व बोऱ्हाडे कुटुंबीयांनी विनामोबदला हस्तांतरित केली. त्यासाठी शेतकरी मधुकर बोराटे, संतोष बोराटे, सुनील बोराटे आणि सिताराम बोराटे यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यांच्या योगदानाबद्दल आमदार लांडगे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. शेतकरी, बांधकाम व्यावसायिक आणि



प्रशासन यांच्या तांत्रिक अडचणींमुळे जागा ताब्यात न आल्यामुळे प्रलंबित असलेले काही रस्ते आम्ही विकसित करण्यात यशस्वी झालो आहोत. याकामी शेतकरी, भूमिपुत्र आणि जागामालक तसेच बांधकाम व्यावसायिक यांच्यात समन्वय करुन समझोता करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. त्यामध्ये आमदार लांडगे यांना यश मिळाले आहे.

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# पीसीसीओईची टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विजयाची 'हॅटट्रिक'!

## शिक्षण विश्व: पीसीसीओईच्या तीन खेळाडूंची पुणे जिल्हा संघात निवड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती व मघनलाल उधाराम वाणिज्य महाविद्यालय, पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस (मुली) स्पर्धेत पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाने (पीसीसीओई) विजय मिळवला.**




सलग तिसऱ्या वर्षी विजय मिळवत हॅटट्रिक साधली. पीसीसीओई संघातील सिद्धी तिवारी, खुशी काळे व आयुषी कुंभारे या तीन खेळाडूंची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आयोजित आंतर विभागीय स्पर्धेसाठी पुणे जिल्हा टेबल टेनिस संघात निवड झाली.

आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस (मुली) स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पीसीसीओई, निगडी संघाने पीसीसीओईआर, रावेत संघाचा २-० गुणफरकाने पराभव करत विजेतेपद पटकाविले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यामध्ये पीसीसीओई, निगडी संघाने आयसीईएम, परंदवडी संघाचा व पीसीसीओईआर, रावेतने एआयटी, दिघी संघाचा पराभव करत अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या अकरा संघांनी भाग घेतला होता.

पीसीसीओई, निगडी आणि पीसीसीओईआर, रावेत या संघांना विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळाल्याबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी यांनी खेळाडूंचे तसेच पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. संतोष पाचारणे, पीसीसीओईआरचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. मिलिंद थोरात यांचे अभिनंदन केले.

## पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड पोलिसांकडून मदतीचा हात

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीला 43 लाख 95 हजारांचा धनादेश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यातील पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड पोलिसांनी मदतीचा हात दिला आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ४३ लाख ९५ हजार रुपयांचा धनादेश मदत स्वरूपात देण्यात आला आहे.**



पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनायकुमार चौबे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ४३ लाख ९५ हजारांचा धनादेश दिला आहे. पोलीस आयुक्त चौबे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धनादेश सुपूर्द केला.

मराठवाड्यात मुसळधार पाऊस कोसळला होता, या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. यात शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं, जनावर मृत्युमुखी पडली, यानंतर अवघ्या महाराष्ट्रातून बळीराजाला मदतीचा हात दिला जात आहे.

## शरद पवारांचे मानस पुत्र विजय कोलते यांनी

# अहिल्यांच्या जागा लाटल्या!: प्रा. लक्ष्मण हाके

### जेजुरीत दसरा मेळावा ठरला ओबीसींच्या हक्कांचा एल्गार : पवार कुटुंबियांचे जमीन लुटीवर मौन का?

। जेजुरी ।
विजयकुमार हरिश्चंद्रे । महाईन्यूज

**राज्याच्या राजकारणात ओबीसी समाजाच्या न्याय हक्कांकडे सर्रास दुर्लक्ष केले जात असून, 'मूळ ओबीसी चालवा – प्रस्थापितांना धडा शिकवा' असा थेट संदेश देत जेजुरी येथील दसरा मेळाव्यात ओबीसी संघर्ष नेत्यांनी राजकीय नेत्यांवर जोरदार हल्ला चढवला.**



प्रा. लक्ष्मण हाके यांनी दसरा मेळाव्यात बोलताना शरद पवार यांचे मानसपुत्र विजय कोलते यांनी "जेजुरीतील होळकर घराण्याच्या ऐतिहासिक जागा लाटल्याचा" गंभीर आरोप केला. विशेषतः शहराच्या मध्यवर्ती चिंचेची बाग आणि त्यालगतची महत्त्वाची जमीन बळकावल्याचे ते म्हणाले की, "ज्या होळकर घराण्याच्या रक्षणातून जेजुरी नगरी उभी राहिली, त्याच घराण्याच्या जागा लाटून राजकीय नेते मालामाल झालेत. शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांनी या लुटीवर मौन बाळगले आहे.

ओबीसी संघर्ष योद्धे प्रा. हाके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानिक तरतुदींचा दाखला देत सांगितले की, "आरक्षण म्हणजे केवळ गरीबी हटवण्याचा कार्यक्रम नव्हे. हा सामाजिक समतेचा आणि न्याय हक्कांचा संविधानिक अधिकार आहे." ते पुढे म्हणाले की, राज्यात १७ आमदार, २ उपमुख्यमंत्री आणि २८ खासदार असूनही ओबीसी समाजासाठी कोणीही ठाम भूमिका घेत नाही. मुख्यमंत्री एक चौथी पास माणसापुढे हतबल होतात, असा टोला त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि फडणवीस यांना लगावला. राज्यातील जातीयवादी धोरणांवर टीका करत हाके म्हणाले की, "अजित पवार सारथीला कोटींचा निधी देतात, पण ओबीसींसाठी महत्त्वाच्या 'महाज्योती' संस्थेला सापत्न वागणूक दिली जाते. हे दुजाभावाचं राजकारण थांबले पाहिजे." धनगर नेते नवनाथ पडळकर यांच्या पुढाकाराने आयोजित मेळाव्यात राज्यभरातून ओबीसी व धनगर बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मंचावर एड. मंगेश ससाणे, शिवानंद हैबतपुरे महाराज, स्वप्नील बरकडे, बापू सोनवलकर, समीर मारकर आदी प्रमुख नेते उपस्थित होते. "गावगाड्याच्या सर्वच पातळीवर प्रस्थापितांचा कब्जा असून, मूळ ओबीसींना राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातून हद्दपार करण्याचे षड्यंत्र सुरू आहे," असा दावा यावेळी ॲड. मंगेश ससाणे यांनी केला.

#### पुणे जिल्ह्याच्या नव्या नावाची मागणी

नवनाथ पडळकर यांनी प्रास्ताविकात "पुणे जिल्ह्याचे विभाजन करून नव्या जिल्ह्याचे नाव 'मल्हार नगर' ठेवावे", अशी मागणी केली. जेजुरीतील होळकर घराण्याच्या ऐतिहासिक वास्तू आणि धर्मस्थळांचे जतन व्हावे, अशीही ठरावात मागणी करण्यात आली. शिवानंद हैबतपुरे महाराज यांनी भाषणात सांगितले की, "बहुजनांचा इतिहास रक्तातून आणि बलिदानातून घडला आहे. न्यूनगंड झटकून नव्या क्रांतीसाठी सज्ज व्हा!" मेळावा संपल्यानंतर हाके, पडळकर यांच्यासह धनगर-ओबीसी बांधवांनी गडावर जाऊन देवदर्शन घेऊन तळीभंडार केला.

## खंडोबाच्या ऐतिहासिक तलवारीला 'मेघडंबरी'त स्थान द्यावे

### प्रा. लक्ष्मण हाके : राज्य सरकारकडे मागणी : दसऱ्यानिमित्त मल्हारगड येथे सोहळा

। पुरंदर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मल्हारी मार्तंड (खंडोबा) देवाच्या दसऱ्यानिमित्त मल्हारगड येथे आयोजित धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने ऐतिहासिक खंड्याचे दर्शन घेण्यात आले. यावेळी खंडोबा देवाची तलवार हाती घेत, ती पुढच्या पिढ्यांसाठी सुरक्षित राहावी यासाठी तलवारीला 'मेघडंबरी'त ठेवून 'राज्य मार्तंड शस्त्र' म्हणून जाहीर करावे, अशी मागणी ओबीसी संघर्ष योद्धे लक्ष्मण हाके यांनी सरकारकडे केली.**




या तलवारीचा इतिहास शेकडो वर्षांपूर्वीचा असून, ती केवळ धार्मिक नव्हे तर ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाची असल्याचे हाके यांनी सांगितले. "दुर्जन प्रवृत्तींविरोधात लढण्याची प्रेरणा या तलवारीतून मिळते. ही तलवार आमच्या संघर्षाची आणि अस्मितेची खूण आहे," असे ते म्हणाले. सोहळ्यानंतर पारंपरिक 'तळी भंडारा' विधी पार पडला. यावेळी ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या लढ्याला बळ मिळावे, या उद्देशाने भंडाऱ्याची उधळण करत विशेष प्रार्थना करण्यात आली. "खंडोबाच्या चरणी जातपात, धर्मभेद विसरले जातात. तसाच एकतेचा आणि हक्काच्या लढ्याचा भंडारा आम्ही आज अर्पण केला," असे ॲड. मंगेश ससाणे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमात चित्रपट दिग्दर्शक राजेंद्र बरकडे, शिवानंद हैबत पुरे महाराज, समीर मारकर, नवनाथ पडळकर, संतोष खोमणे, सचिन मोरे, गणेश कुंभार, बापू लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. विविध जिल्ह्यांतून ओबीसी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

#### ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी लढा...

श्री मार्तंड देवस्थान ट्रस्टच्या वतीने पीआरओ गोडसे आणि महेश शिंदे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. देवस्थानचे इतर पदाधिकारी अनुपस्थित होते. गुरव पुजारी वीर कोळी घडशी व सेवेकरी वर्गाच्या वतीने हाके आणि ससाणे यांचा धार्मिक सन्मान करण्यात आला. याचे पौरहित्य वैभव दीडभाई गुरुजी यांनी केले. कार्यक्रमात ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी संघटित लढ्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या तलवारीचे पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली योग्य जतन व्हावे, तसेच ती समाजप्रबोधन आणि इतिहास अभ्यासासाठी वापरण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046